# माझी समाजसेवा (My Social service)

मित्रांनो परत एकदा गोंधळलात ना ! मी कधी नेता झालो म्हणून ? असो .

समाजसेवा हा शब्द ऐकला म्हणजे प्रत्येकाच्या डोळयासमोर एखादया पक्षाचा नेता , कार्यकर्ता , नगरसेवक , आमदार , खासदार येतो . याचे कारण म्हणजे पद असल्याशिवाय समाजसेवा करताच येत नाही हा आजच्या परिस्थितीने सगळयांना शिकवलेला ‘धडा’ .

खरेतर ‘सेवानिकृत्ती’ व ‘समाजसेवा’ यांचेही जवळचे नाते आहे . सेवानिवृत्ती म्हणजे नोकरी , व्यवसायातून मुक्तता . आयुष्यभर नोकरी , व्यवसाय केल्यानंतर हक्काच्या विश्रांतीचा काळ . परंतु जर का आपण थोडा विचार केला तर असे कळेल की ‘सेवानिवृत्ती’ ह्या शब्दात एक अदृष्य विचार दडलेला आहे . सेवानिवृत्ती म्हणजे नोकरीतून आपली सुटका . पण विश्रांतीसाठी नव्हे किंवा विश्रांतीच्याबरोबरीने समाजाच्या सेवेसाठी . नोकरीतून निवृत्ती ‘समाजाची सेवा’ करण्यासाठी . समाजाने केलेल्या उपकाराची परतफेड म्हणून . माझ्या समाजसेवेसंबंधी लिहण्यापूर्वी मी तुम्हाला आपल्या सर्वांना माहीत असलेल्या आश्रम व्यवस्थेबद्यल सांगतो .

आपण जन्माबरोबर स्वार्थ घेऊन येतो . लहानपणी आपल्याला हवी असलेली प्रत्येक गोष्ट आपण हट्टकरून मिळवतो . परंतु ८ वर्षांचा झाल्यानंतर मुंज करून गुरूकडे विद्याभ्यासासाठी पाठविण्याची त्यावेळी प्रथा होती . स्वतःचा स्वार्थ कमी करण्याची ही शिकवणच होती .

विद्याभ्यास पूर्ण झाल्यानंतर , लग्न करून गृहस्थाश्रमात माणूस प्रवेश करतो .‘ स्व’ चा अर्थ गृहस्थाश्रमात अधिक व्यापक स्वरूप धारण करतो . गृहस्थाश्रमात ‘ स्व ’ म्हणजे मी व माझ्यावर अवलंबून असलेली मंडळी .

त्यानंतर वानप्रस्थाश्रम सुरू होतो . स्वार्थत्याग व इंद्रियांवर मिळविलेला ताबा आल्यानंतर कुटूंबाची जबाबदारी मुलांवर सोपवून वनात जाणे . या आश्रमात ‘ स्व ’ या शब्दात निसर्गाचाही समावेश होतो व आपोआप दृष्टी मानवसमाजाच्या पलीकडील वास्तवावर विचार करू लागते .

शेवटची पायरी म्हणजे संन्यासाश्रम . ह्या आश्रमात आत्मज्ञान किंवा ज्ञानप्राप्ती करून सर्व कर्मांचा त्याग करायचा हा काळ .

ही आश्रमपद्धती सांगण्याचा उद्येश एवढाच की वयानुसार स्वतःचा स्वार्थ कमी होत गेला पाहिजे . तसेच इंद्रियांवर ताबा मिळवत आत्मज्ञान प्राप्त करून मोक्ष मिळविला पाहिजे . प्रस्तावना फारच लांबली . आता माझ्या समाजसेवेसंबंधी थोडेसे .

समाजाची सुरवात आपल्यापासूनच होते. त्यामुळे समाजसेवेची सुरवात स्वतःपासूनच होणे आवश्यक आहे. स्वतःची कामे स्वतः करणे , जास्तीत जास्त स्वावलंबी होणे व त्याचबरोबर आपल्या कुटूंबाला मदत करणे ही पहिली पायरी. ज्या परिस्थितीत मी लहानाचा मोठा झालो , त्यामुळे ह्या प्रकारच्या समाजसेवेचे बाळकडू मला लहानपणीच मिळाले व आजतागायत तेव्हापासून मी ते व्रत म्हणूनच पाळत आहे.

शाळेत असताना वर्ग साफ असण्याकडे लक्ष पुरवणे , मित्रांना अभ्यासात मदत करणे , शेजा-यांची लहान सहान कामे करणे , घराच्या सभोवतलाचा परिसर स्वच्छ ठेवणे , लहान फुलझाडे लावणे व त्यांची देखभाल करणे वगैरे गोष्टी करत मी लहानाचा मोठा झालो.

उच्च शिक्षण पूर्ण करून मी उच्च पदावर काम करू लागलो. या पर्वात मी माझ्या ऑफीसच्या कामाच्या माध्यमातून समाजसेवा करू लागलो. मला कल्पना आहे हे वाचून तुम्ही चक्रावला असाल. तुम्ही म्हणाल काय मोठे तत्वज्ञान सांगतो आहे ? पगार घेऊनच नोकरी करत होतात ना ?

तुमचे बरोबर आहे. पगार मिळत होताच. मी माझे जबाबदारीचे काम निरपेक्षबुद्धीने फळाची अपेक्षा न धरता (पगार सोडून) संस्थेच्या भल्यासाठी , वरिष्ठांच्या मूडची पर्वा न करता करत गेलो. हे खूप कठीण व्रत आहे. पहा विचार करून. तुमच्या स्वतःपासूनच विचार किरा आणि मगच मत बनवा. अशा प्रकारचे काम मी १0 वर्षे नोकरीत व त्यानंतर २४ वर्षे माझ्या CA च्या व्यवसायात करत आहे.

आज बरेच व्यावसायिक आपल्या व्यवसायाचे रूपांतर धंद्यात करत आहेत व आपल्या शिक्षणामुळे किंमत लाभलेली सही व रबर स्टॅंप केवळ ‘ किंमत ’ वसूल करण्यासाठी वापरत आहे. ही प्रवृत्ति टाळून केवळ संस्थेच्या भल्यासाठी , पुढील वर्षी Audit चे काम काढून घेतले जाईल ही भीती असताना सुद्धा एवढी वर्षे व्यवसायात मानाने राहणे ही तारेवरची कसरत प्रत्येकालाच दिसेल वा समजेल असे नाही.

बरीच वर्षे जवळजवळ १८वर्षे Surveyor म्हणूनही काम केले. माझ्या रिर्पोटवर पॉलीसी धारकाला नुकसान भरपाई मिळे. ह्यावेळी सुद्धा मी माझ्या पदाचा कधीही दुरूपयोग केला नाही. माझ्या काम करण्याच्या ह्या विशिष्ट पद्धतीवर पॉलीसी धारकांचा विश्वासच बसत नसे. आज बाजारात सर्वच गोष्टी ‘विकायला’ आहेत त्यात व्यावसायिकाची भर पडली आहे. ‘ मी विकावू नाही ’ हे त्यांना पचतच नसे. ह्या व्यवसाय प्रामाणिकपणे काम करणारे सोडून बहुसंख्येने २ प्रकारचे व्यावसायिक आहेत. प्रकार एक – प्रत्यक्ष नुकसानीपेक्षा जास्त नुकसान झाले आहे असा रिपोर्ट देणे व भ्रष्टाचार करणे. प्रकार दोन – प्रत्यक्ष नुकसानीपेक्षा कमी नुकसान झाले आहे असा रिपोर्ट देऊन मी तुझे नुकसान करू शकतो अशी धमकी देणे व भ्रष्टाचार करणे.

व्यवसाय करत असतानाच मी पेपर तपासनिकाचे काम करत असे. माझ्याकडे ICAI, ICSI, IIB, ICWA ह्या संस्थांकडून पेपर येत. खरेतर प्रत्येक पेपर मागे रू.४ मिळत व १ पेपर तपासायला कमीत कमी २0 मिनीटे लागत. पेपर आणणे , तपासून झाल्यानंतर संस्थेकडे पाठविणे वगैरे हा वेळ वेगळाच. म्हणजेच पेपर तपासणीचे काम पैशासाठी कधीच फायदेशीर नव्हते. बरे हे पैसे तरी वेळेवर मिळत का ? तर नाही. चांगले ५ – ६ महिन्यानंतर पैसे मिळत. असे असतानासुद्धा हे काम मी १५ वर्षे केले. अर्थातच 'समाजसेवेच्या' भावनेतूनच. मी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर असा विचार केला कि मी एवढे उच्च शिक्षण घेतले तेव्हा कोणीतरी माझे पेपर तपासत होताच. तेव्हा आता आपली टर्न आहे. या भावनेतूनच पेपर तपासणीचे काम मी सुट्टीच्या दिवशी , रात्री असे करत असे.

मोठया कंपन्यांची , बॅंकाची ऑडीट करताना मी हाऊसिंग सोसायटीची ऑडीटची कामे ही रविवारी करत असे. ह्या कामाबद्यल मला १ वर्षाच्या ऑडीट साठी रू. २१0 /- मिळत. खरे तर ही फी गाडीभाडे , पदाधिका–यांना घरी किंवा ऑफीस मध्ये आले असता चहा , फराळ याच्यात खर्च होत. एवढयाशा पैशासाठी कोणी नवोदित CA सुद्धा काम करायला तयार नसे व सोसायटीचे ऑडीट बरीच वर्षे होत नसे. मी अश्या कित्येक सोसायटयांचे ऑडीट पूर्ण करून पदाधिका–यांच्या मनावरील ताण कमी करण्यास कारणीभूत होत असे.

अशी सोसायटयांची ऑडीट सुद्धा मी १0 – १५ वर्षे केली. खूप मित्र , हितचिंतक जोडले गेले व आजही मला ही मंडळी भेटतात व सांगतात कि तुम्ही ऑडीट केल्यानंतर परत बरीच वर्षे ऑडीट घेऊ शकले नाही. मी केलेल्या निरपेक्षकामाची आजही आठवण निघणे ही माझ्यासाठी समाधानाची गोष्ट आहे. माझे उच्च शिक्षण , मी करत असलेली मोठी ऑडीट , सर्व्हे ची कामे ऐकून मी अशी लहान सहान कामे सुद्धा करतो याचे त्या मंडळींना खूप अपूप वाटे व ऑडीट फी चा माफक चेक देताना त्यांचीच मानसिक कुचंबणा होत असे. परंतु मी कधीही सरकारने नेमून दिलेल्या फिच्याव्यतिरीक्त जास्त पैसे घेतले नाहीत.

१९८७ साली मी ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला व त्यानंतर यथायोग्य सल्ला गरजूंना दिला. कोणताही मोबदला न आकारता. काही वर्षांनी कार्य बाहुल्यामुळे मला हा उपक्रम बंद करावा लागला. परंतु आता निवृत्तीच्या पुर्वसंस्थेला मी परत एकदा Medical Astrology चा अभ्यास जोरात सुरू केला आहे. या अभ्यासानंतर पत्रिकेवरून तब्बेतीची काय काळजी घ्यावी ? कोणते आजार होऊ शकतील ? याबाबत मी मार्गदर्शन करू शकेन.

१९९८ साली मी पर्यायी वैद्यकिय शिक्षण घेतले. ॲक्युप्रेशर , मॅग्नेट, निसर्गोपचार , जीवनसत्वे व आहार यांचा अभ्यास , होमीयोपॅथी , पॅथालॉजी रिपोर्टचा अभ्यास वगैरे गोष्टी एका निष्णात डॉक्टरच्याकडे शिकलो. त्यानंतर वैद्यकिय शास्त्राची बरीच पुस्तके विकत घेतली , लायब्ररीतून आणून वाचली व हे सर्व आजही १0 वर्षानंतर चालू आहे. ह्या उपक्रमासाठी मी रू.१५000 /- खर्च केले. १९९९ पासून माझ्या कुवतीनुसार ओळखीच्या लोकांना सल्ला देऊ लागलो.

त्यांच्या समस्या समजून घेऊ लागलो , उपाययोजना सुचवित गेलो . त्यांना धीर दिला , या सर्व गोष्टींसाठी आठवडयातून १ दिवस राखीव असतो . आमच्या सोसायटीतील बरेच सिनीयर सिटीझन याचा फायदा घेतात . मी रक्तदाब मोजतो व त्याचे रेकॉर्ड ठेवतो . तरूणवर्गाच्या समस्या जाणून घेतो व सल्ला देतो . ही सर्व सेवा मी विनामूल्य करतो व त्यात मला आनंदच होतो . हा आनंद व समाधान हीच माझी शक्ती आहे . आठवडयातील त्या दिवसाची सर्व मंडळी वाट पहात असतात .

बरीच वर्षे मी ट्रेनिंग कॉलेजात बॅंक कर्मचा–यांना प्रशिक्षण दिले . त्याचबरोबर त्यांचा व्यक्तीमत्वविकास घडविण्याचा प्रयत्न केला . नोट्स वेळोवेळी अपडेट केल्या व ट्रेनिंग मॅन्युअल तयार केले . प्रशिक्षण देण्याच्या पद्धती विकसित केल्या . बॅंक अधिका–यांना प्रशिक्षण कसे द्यावे याचे मार्गदर्शन केले व ते बॅंक अधिकारी माझ्या उपस्थितीत स्वतंत्रपणे प्रशिक्षण देऊ लागले . त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला व त्यांच्या कामात हाच आत्मविश्वास मोलाची कामगिरी बजावता झाला . मला प्रशिक्षण देण्याचा आनंद होता पण आपल्यासारखेच प्रशिक्षण देणारे व्याख्याते तयार करणे ही माझ्यासाठी खचितच जास्त आनंददायी गोष्ट होती .

आज मी निवृत्तीच्या उंबरठयावर उभा आहे . आयुष्यभर केलेले काम , व्यवसायात उपयोगी पडणारी मी लिहलेली ७ पुस्तके , वैद्यकिय शिक्षण , प्रशिक्षणाचा अनुभव , ज्योतिष , फोटोग्रॉफी , आपल्या मनातील उठलेल्या स्पंदनांना दिलेले शब्दरूप वगैरे प्रचंड माहीतीच्या खजिन्याचा सर्व लोकांना उपयोग व्हावा म्हणून मी स्वतःची वेबसाईट ‘ **www. spandance.com** ’ सुरू केली व साईटला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादाने मी अत्यंत समाधानी आहे . साईट बनविण्यासाठी स्वतःचे रू . २५000 /- खर्च करणे हा सुद्धा समाजसेवेचा एक वेगळा प्रयोगच आहे . ही वेबसाईटची माहीती वेळोवेळी अद्ययावत ही करत आहे .

प्रासंगिक स्वरूपातील ‘समाजसेवासुद्धा’ वेळोवेळी करत आहे . संस्थांना वेळोवेळी देणग्या दिल्या . १९९६ साली मला अपघात झाला . Insurance कंपनीकडून मी नुकसानभरपाई वसूल केली व तो चेक पास व्हायच्या आधीच १0 % देणगी चांगल्या संस्थांना दिली . त्याचप्रमाणे परिक्षेत चांगले मार्क मिळविणा–या विद्यार्थांना बक्षिसे देण्याची सवय ठेवली आहे . निसर्गाच्या कोपामुळे पोळलेल्या लोकांच्या मदतीसाठी मी नेहमीच देणगी दिली आहे . बांगलादेशयद्ध , कारगिलयुद्धानंतर सुद्धा सढळ हाताने मदत केली . माझ्या वडिलांनी ज्या तळेगावच्या इस्पितळात टि . बी . साठी आरोग्यसेवा घेतली त्या इस्पितळाला नोकरी लागल्यानंतर लगेचच रू . १000 देणगी दिली होती . ( १९७५ ) त्यावेळी माझा पगार फक्त रू . १२५0 /- होता . माझ्या मृत्यूपत्रात सेवाभावी संस्थांना देणगी देण्याबद्यल स्पष्ट निर्देश दिले आहेत . नोकरीत असताना माझ्या सहका–याना मी तात्पुरती आर्थिक मदतही आकस्मिक कारणांसाठी करत असे . एकदा तर **Rs. १0000 /-** ची मदत केल्यानंतर मी नोकरी सोडली . मी ज्यांना मदत केली त्यांनी माझे पैसे परत केले .

माझे वेगळेपण मी मुद्दाम सांगतो आहे कि माझा स्वभाव चौकस आहे. माझे शिक्षण , पद वगैरे गोष्टी विसरून मी लहान मुले ते म्हातारी माणसे कोणत्याही वयोगटातील लोकांच्याबरोबर गप्पा मारू शकतो. त्यांच्या समस्या जाणून घेऊ शकतो. लहान मुलांना माझ्या लहानपणचे खेळ शिकवतो. प्रत्येक सेवाभावी माणसाबद्दल मला आदर आणि सॉफ्ट कॉर्नर आहे. मी रिक्शावाल्याबरोबर , टॅक्सी ड्रायव्हर बरोबर , कंडक्टरबरोबरसुद्धा गप्पा मारतो. ऑडीटच्या वेळी मी मॅनेजरच्या बरोबरीने प्यूनशी ओळख करून घेतो. त्या ओळखीचा उपयोग मला ऑडीटसाठी, कागदपत्रे फाईली वेळेवर मिळण्यासाठी होतो. प्यूनलाही ऑडीटर आपल्याशी बोलतो ह्या गोष्टींचे अप्रूप वाटते. खरेतर त्याच्या बरोबर त्याच्या समस्या जाणून घेताना , संस्थेतील लोकांबद्दल , तेथील वातावरणाबद्दल बरीच उपयुक्त माहीती मिळते. नाहीतरी Audit हा शब्द Latin word ' audire ' ह्या शब्दाची व्युप्तत्ती आहे. त्याचा अर्थ ' To hear' म्हणजे ' ऐकणे. ' माझ्या विचारपूस करण्यामुळे मला बरेच ' ऐकायला ' मिळते.

एका संस्थेत कर्मचारी संघटनेचा ' नियमानुसार काम ' असा आदेश होता. परंतु मी ऑडीटला गेल्यानंतर , संघटनेच्या सेक्रेटरींचा फोन आला कि आपल्या आंदोलनाचा फटका मला बसता कामा नये व कर्मचा–यांनी मला पूर्ण सहकार्य करावे. आज ही घटना मी विकसित केलेल्या माणसा माणसामधील संबंधाना सलाम ह्या भावनेतून मला आनंद देते.
आज म्हाता–या माणसांबरोबर संवाद साधायला मला फार आवडते. म्हाता–यांबरोबर घरातील मंडळी कमीत कमी संभाषण करतात असा अनुभव आहे. कोणीतरी आपल्याशी बोलावे अशी त्यांची अपेक्षा असते. ही अपेक्षा मी पूरी करतो. माझी संगतही त्यांना आवडते. पुढेमागे एखाद्या वृद्धाश्रमात काम करायची माझी इच्छा आहे.

निवृत्तीनंतरचे आयुष्य समाजसेवेसाठी व्यतित करायचा मानस आहे. समाजसेवाभावी संस्थांची माहीती इंटरनेटच्या मायाजालातून शोधणे चालू आहे.

काय मित्रांनो तुम्ही करता की नाही 'समाजसेवा' ?